अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - १७ / २००८.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १८ -१० -२००८.

अहमदनगर महानगरपालिकेच्या खास सभेची सुचना.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ह) अन्वये.)
सभा सुचना क्रमांक १७ , दिनांक २२-१०-२००८.

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती.............................................................

सदस्य / सदस्या, प्रभाग क्रमांक
अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

महोदय / महोदया,

यांस-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ह) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा बुधवार दिनांक २२-१०-२००८ रोजी दुपारी १-०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषयपत्रिका.
२. प्रस्तावाची टिप्पणी.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

सभा क्रमांक १७ दिनांक २२-१०-२००८ रोजी दु. १.०० वां होणा-या मा.खास सभेची विषय पत्रिका.

**-- *--**

| विषय क्रमांक | विषय |
|---|---|
| १ | अहमदनगर महानगरपालिकेतील कर्मचा-यांना सन २००७-२००८ करीता सानुग्रह अनुदान देणेबाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव सादर. |
| २ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : १८-१०-२००८.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १ दिनांक : २२-१०-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिकेतील कर्मचा-यांना सन २००७-२००८ करीता सानुग्रह अनुदान देणेबाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव सादर.

-- * --

**प्रस्तावाचा मजकूर :** मा.श्री.कोतकर भानुदास एकनाथ, नगरसेवक यांनी दिनांक २६/०८/२००८ रोजी पत्र देवुन " महानगरपालिकेच्या निरनिराळया विभागातील कर्मचा-यांनी एकत्रितरित्या समक्ष भेटुन सालाबाद प्रमाणे दिपावली सणानिमित्त सानुग्रह अनुदान मिळावे याकरिता मागणी केलेली आहे. अहमदनगर महानगरपालिकेमधील २५५० कायम कर्मचा-यांना दिवाळी सणाकरीता सन २००६/२००७ या वर्षाकरीता प्रत्येकी रुपये ७,०००/- सानुग्रह अनुदानाप्रमाणे रक्कम रुपये १,७०,७९,४२०/- देण्यांत आले होते असे माहिती घेता समजले. तरी अहमदनगर महानगरपालिकेमधील कायम कर्मचा-यांना दिवाळी सणाकरीता सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाकरीता त्यांचे वेतनातुन कुठल्याही प्रकारची कपात न करता दिपावली सणाकरीता सानुग्रह अनुदान देणेचे दृष्टीने मा.महासभेपुढे निर्णय होणे आवश्यक आहे. यास्तव सदर विषयाबाबत सविस्तर कार्यालयीन प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे निर्णयासाठी लवकरात लवकर घेण्यांत यावा असे नमुद करुन सुचित केलेले आहे.

तसेच मा.श्री.कावरे आसाराम हरिभाऊ, नगरसेवक यांनी पत्र देवुन महानगरपालिका कर्मचा-यांना दिवाळी सणा निमित्त रु.१०,०००/- (रुपये दहा हजार मात्र) प्रत्येकी मंजुर करणेकामी त्वरीत सभा बोलावुन विषय घेणे बाबत विनंती केलेली आहे.

तसेच अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांनी दिनांक ०१/०९/२००८ रोजी पत्र देवुन खालील प्रमाणे मागणी केलेली आहे.

" १. दिनांक २८ आक्टोबर २००८ रोजी दिवाळी सण असल्याने महानगरपालिकेतील सर्व कामगारांना सन २००७-२००८ या सालासाठी त्यांच्या भत्त्यासह होणा-या वार्षिक मिळकतीच्या २०% रक्कम बोनस म्हणुन दिवाळी सणापुर्वी अदा करण्यांत यावी. २. महानगरपालिकेतील सर्व कामगारांना दिवाळी सणासाठी सानुग्रह अनुदानापोटी रक्कम रु.११,०००/- (अक्षरी रुपये अकरा हजार मात्र) दिवाळीपुर्वी विनाअट देण्यांत यावी. " तसेच सदरच्या मागणी बाबत उपरोक्त पत्रामध्ये अहमदनगर महानगरपालिकेतील सर्व कामगार दिनांक १५/०९/२००८ पासुन किंवा त्यानंतर संपावर जातील असे नमुद करुन संप नोटीस दिलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना यापुर्वी सन २००६-२००७ सानुग्रह अनुदान बाबतचा विषय निर्णयासाठी मा.महासभेपुढे सादर करणेत आलेला होता. सदर विषयाबाबत मा.महासभेने प्रस्ताव क्र.३ दिनांक ०३/११/२००७ अन्वये दिपावली सणानिमित्त कायम कर्मचा-यांना रक्कम रुपये २,०००/- (रुपये दोन हजार मात्र) देण्यास मान्यता दिलेली होती. परंतु तद्नंतर सर्व महानगरपालिका कर्मचारी यांनी काम बंद, धरणे आंदोलन केले त्यावेळेस सणासुदीचे दिवस व आरोग्याच्या दृष्टीने मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, व इतर पदाधिकारी यांचेत संयुक्त बैठक झाली.

सदरच्या बैठकीमध्ये चर्चा होवुन कामगार युनियन यांचेबरोबर चर्चा होवुन पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत आला.

१. सन २००६-२००७ या आर्थिक वर्षासाठी अहमदनगर महानगरपालिकेतील पात्र कायम कर्मचा-यांना (प्रोबेशनरीसह) प्रत्येकी रु.७,०००/- (अक्षरी रुपये सात हजार मात्र) सानुग्रह अनुदान देण्यांत यावे.

२. या बाबतचा सन २००६-२००७ वर्षासाठीचा करार करण्यांत यावा यापुढील काळात तो बंधनकारक राहणार नाही.

३. आयुक्तांनी वरील प्रमाणे रक्कम रु.७,०००/- ची अदाई त्वरीत करावी व कार्योत्तर मंजुरीसाठीचा प्रस्ताव लगतच्या महासभेपुढे ठेवावा.

वरील प्रमाणे करार महानगरपालिका पदाधिकारी अधिकारी व कामगार युनियन पदाधिकारी यांचे बरोबर करणेत आलेला आहे.

उपरोक्त कराराप्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेमधील पात्र कर्मचा-यांना सन २००६-२००७ या आर्थिक वर्षासाठी प्रत्येकी रुपये ७,०००/- दिवाळी सणाकरीता सानुग्रह अनुदान देण्यांत आले.

सदर दिवाळी सण सानुग्रह अनुदानासाठी रुपये १,७०,७९,४२०/- इतका खर्च अदा केलेला होता. त्यास कार्योत्तर मंजुरीसाठीचा प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करणेत आला असता त्यास मा.महासभेपुढे प्रस्ताव क्रमांक ३ दिनांक १८/१२/२००७ अन्वये ठराव मंजुर करुन अदा करणेत व त्याकामी खर्चास कार्योत्तर मंजूरी देणेत आली.

अहमदनगर महानगरपालिकेमध्ये सध्या आस्थापना कायम सुचीवर २५५० कर्मचारी कार्यरत आहेत. सन २००८-२००९ या वर्षातील आर्थिक संकल्पामध्ये सानुग्रह अनुदान या शिर्षकाखाली तरतुद रुपये ५,००,०००/-(रुपये पाच लाख) इतकी केलेली आहे.

मा.शासनाने राज्य शासकीय व महागाई भत्ता पात्र इतर कर्मचा-यांना दिवाळी बोनस व सानुग्रह अनुदान देणे बाबतचा निर्णय अद्याप पर्यत घेतलेला नाही.

अहमदनगर महानगरपालिकेमधील पात्र कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणे बाबतचा निर्णय धोरणात्मक असल्यामुळे सदरचा विषय मा.महासभेत निर्णय होणे संयुक्तीक होईल.

तरी सदर बाबतचा विषय मा.महासभेपुढे निर्णयासाठी ठेवणेंस मंजुरी बाबत आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, " प्रस्तावित बाब धोरणात्मक स्वरूपाची असलेमुळे आपले स्तरावर निर्णय घेणे संयुक्तिक तसेच अदा करणे झालेस महानगरपालिका लेखा संहिता १९७१ मधील नियम नं. २८,२९ व ३० प्रमाणे कार्यवाही करणे योग्य."

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, १. सानुग्रह अनुदान महानगरपालिका कर्मचा-यांना मंजुर केल्यास आस्थापना खर्चात वाढ होणार आहे. नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १००५ / वर्गिकरण / प्र.क्र. ३७९/५०/नवि -२४ दि.४ मे २००६ नुसार आस्थापना खर्चाची टक्केवारी ३५ % इतकी नमूद केली आहे. प्रत्यक्षात सन २००७-२००८ मध्ये आस्थापना खर्च ४६.४० % इतका झाला आहे.

२. सध्या महानगरपालिकेची आर्थिक स्थिती समाधानकारक नाही. शासनाकडून मंजुर व प्राप्त झालेल्या खालील अनुदानाचा महानगरपालिका हिस्सा अद्याप भरलेला नाही.

| अ.नं. | | महानगरपालिकेचा हिस्सा |
|---|---|---|
| १ | मुलभूत सुविधा विकास निधी | ३.५० कोटी |
| २ | UIDSSMT केडगांव पाणी पुरवठा | १.२७ कोटी |
| ३ | शिक्षण मंडळ वर्गणी ५० % | १.१७ कोटी |
| ४ | मुलभूत सुविधा विशेष अनुदान | २.२४ कोटी |
| | एकुण | ८.१८ कोटी |

वरील प्रमाणे ८.१८ कोटी हिस्सा भरण्यासाठी महानगरपालिकेकडे निधी उपलब्ध नाही.

३. आज अखेर (४-०९-०८) महानगरपालिका फंडातून ठेकेदार , पुरवठादार व इतर देयकांची रू.१.५० कोटी रक्कम देणे बाकी आहे. महानगरपालिका फंडात आवश्यक निधी शिल्लक नसल्याने सदर देयके अदा करण्यांत अडचण येत आहे.

४. सध्या दरमहा दि. २ ते २० अखेर ठेकेदार व पुरवठादार यांची देयके अनुदान उपलब्ध असल्यासच अदा केली जातात. त्यानंतर २१ ते १ पर्यंत दरमहा कर्मचा-यांच्या वेतनासाठी अत्यावश्यक देयके वगळता ठेकेदारांची देयके अदा करणे स्थगित केले जाते.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणे शक्य होणार नाही.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, " अ " पाहता सानुग्रह अनुदान देता येणार नाही. करीता संबंधितांना तसे कळविणेसाठी मंजुरीस्तव सादर.

यावर व्ही.एस.थोरात,आस्थापना प्रमुख यांचा फेरसादर रिपोर्ट की, अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदानापोटी रक्कम रूपये ११,००० /- (अक्षरी रूपये अकरा हजार फक्त ) मिळणे बाबत महानगरपालिका कामगार युनियन यांनी पत्र देवुन मागणी केलेली आहे. सदर मागणी बाबत कामगार युनियन यांनी दिनांक ७-६-२००८ रोजी पासून महानगरपालिका कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू केले असता जा.क्र.आस्था २४६६ दिनांक ७-१०-२००८ कामगार युनियन यांना पत्र देवुन मा.आयुक्त साहेब यांचे दालनात दिनांक १३-१०-२००८ रोजी चर्चा करणेकामी बैठक आयोजित करण्यांत आली होती.

सदर बैठकीमध्ये अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांनी महानगरपालिका कामगार यांना दिवाळी सणासाठी प्रत्येकी रूपये ११०००/- सानुग्रह अनुदान मिळालेच पाहिजे अशी मागणी केलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेमध्ये सध्या आस्थापना सुचीवर २५५० कायम कर्मचारी कार्यरत आहेत. सदर कर्मचा-यांना दिवाळी सणासाठी प्रत्येकी रूपये ११,००० /- सानुग्रह अनुदान देणे झाल्यास एकुण अंदाजे रक्कम रूपये २,८०,५०,००० /- अक्षरी रूपये दोन कोटी ऐंशी लाख पन्नास हजार फक्त ) इतका खर्च अपेक्षित आहे.

आस्थापना वरील खर्चाची टक्केवारी प्रत्यक्षात सन २००७-२००८ मध्ये ४६.४० % इतका झालेला आहे. सध्या महानगरपालिकेची आर्थिक स्थिती समाधानकारक नाही. शासनाकडून मंजुर व प्राप्त झालेल्या खालील अनुदानाचा मनपा हिस्सा ८.१८ कोटी भरण्यासाठी महानगरपालिकेकडे आवश्यक निधी उपलब्ध नसल्याने सदरचा निधी अद्याप भरलेला नाही.

तसेच मनपा फंडातून ठेकेदार,पुरवठादार व इतर देयकांची रूपये १.५० कोटी रक्कम देणे बाकी आहे. आवश्यक निधी शिल्लक नसल्याने सदर देयके अदा करण्यांत अडचणी येत आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात कर्मचा-यांना दिवाळी सानुग्रह अनुदान प्रत्येकी रूपये ११,००० /- देणे शक्य होणार नाही, असे मुख्य लेखाधिकारी यांनी नमुद केलेले आहे.

सबब आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, माहे सप्टेंबर २००८ च्या वेतनातील वजाती, रक्कमांची जमाखर्ची, ऑक्टोंबर २००८ चे वेतन व पेन्शन, निवडणूक खर्च , ठेकेदार व पुरवठादार यांची प्रलंबित देयके अदा करणे व वर नमुद केलेल्या बाबीवरील खर्च विचारात घेता रक्कम रूपये ११,००० /- सानुग्रह अनुदान देणे शक्य नाही.

तथापि ठेकेदार व पुरवठादार यांची ५० % देयके अदा करणे थांबविल्यास व दिनांक १३-१०-२००८ रोजी मा.आयुक्त यांचे दालनात झालेल्या बैठकीतील चर्चेप्रमाणे कर्मचा-यांना रू. २,००० /- सानुग्रह अनुदान देणे शक्य होईल. याबाबत मा.महासभेने निर्णय घेणे योग्य राहील.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित नुसार अंतिम निर्णय घेणे साठी मा.महासभेकडे प्रस्ताव पाठविणे योग्य राहील करीता मंजुरीस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, आस्थापना प्रमुख चर्चा करावी.

यावर आस्थापना प्रमुख यांचा अभिप्राय की, चर्चा झाली. मा.पदाधिकारी व संबंधित अधिकारी व युनियनचे पदाधिकारी यांची संयुक्त बैठक मा.आयुक्त साो.यांचे दालनात दि.१५-१०-२००८ रोजी बोलाविली.

यावर आस्थापना प्रमुख यांचा फेरसादर रिपोर्ट की, विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, दि. १५-१०-२००८ रोजी मा.पदाधिकारी व अधिकारी तसेच कामगार युनियनचे सर्व पदाधिकारी यांचेशी झालेल्या संयुक्त बैठकीत वाटाघाटी व चर्चा करण्यांत येवुन चर्चेनुसार महानगरपालिकेतील सर्व पात्र कर्मचा-यांना सन २००७-२००८ करीता सानुग्रह अनुदान म्हणुन प्रत्येकी रू. ७,००० /- देण्यांचे उभय पक्षाने मान्य करण्यांत आले. त्याप्रमाणे कर्मचा-यांस सानुग्रह अनुदान देण्यांचा करार दि. १५-१०-२००८ रोजी करण्यांत आला त्याप्रमाणे सदरचा विषय मा.महासभेपुढे घेणे आवश्यक होते. तथापि दि.१६-१०-२००८ रोजी महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी आचारसंहिता लागु झाल्याने याबाबत इकडील जा.नं. आस्था.२६०० दि.१७-१०-२००८ अन्वये मा.राज्य निवडणूक आयोग यांचे मार्गदर्शन मागविण्यांत आले असता मा.राज्य निवडणूक आयोग यांनी दि.१८-१०-२००८ च्या पत्रानुसार याबाबत महासभा घेण्यांस अनुमती दिली आहे. मात्र सानुग्रह अनुदानाचे वाटप करतांना त्यामध्ये कोणत्याही पदाधिका-याचा किंवा राजकीय पुढा-याचा समावेश असु नये असे सुचित केले आहे.

तरी मा.राज्य निवडणूक आयोग यांचे पत्रानुसार व त्यांनी दिलेल्या मार्गदर्शनानुसार कार्यवाही करण्यांस सदरचा विषय मा.महासभेपुढे घेणेबाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित नुसार मा.महासभेकडे निर्णयार्थ विषय सादर करणेसाठी मंजुरीस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, नगरसचिव प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवणे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मुख्यलेखापरिक्षक, मुख्यलेखाधिकारी, मा.उपायुक्त (सा) , मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह व आस्थापना प्रमुख यांचे फेरसादर रिपोर्टासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

ठराव :- अहमदनगर महानगरपालिकेतील कायम कर्मचा-यांना सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात सानुग्रह अनुदान देणे बाबत सभागृहात आज दिनांक २२/१०/२००८ रोजी चर्चा झाली. सविस्तर चर्चा होवून प्रत्येकी रक्कम रुपये ७,०००/- (रक्कम रुपये सात हजार मात्र) सानुग्रह अनुदान देणे बाबत सर्वानुमते मंजूरी देणेत आली. तसेच सदर ठराव याच सभेत कायम करण्यासही मान्यता देणेत येत आहे. मा.आयुक्त यांनी तात्काळ अंमलबजावणी करावी.

सुचक : मा.श्री.कृष्णा जाधव.
अनुमोदक : मा.श्री.आसाराम कावरे.
ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.
आस्थापना विभाग-
दिनांक : १८-१०-२००८.

विषय : अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना सन २००७-२००८ करीता सानुग्रह अनुदान देणे बाबत.

फेरसादर,

विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, दि. १५-१०-२००८ रोजी मा.पदाधिकारी व अधिकारी तसेच कामगार युनियनचे सर्व पदाधिकारी यांचेशी झालेल्या संयुक्त बैठकीत वाटाघाटी व चर्चा करण्यांत येवुन चर्चेनुसार महानगरपालिकेतील सर्व पात्र कर्मचा-यांना सन २००७-२००८ करीता सानुग्रह अनुदान म्हणुन प्रत्येकी रू. ७,००० /- देण्यांचे उभय पक्षाने मान्य करण्यांत आले. त्याप्रमाणे कर्मचा-यांस सानुग्रह अनुदान देण्यांचा करार दि. १५-१०-२००८ रोजी करण्यांत आला त्याप्रमाणे सदरचा विषय मा.महासभेपुढे घेणे आवश्यक होते. तथापि दि.१६-१०-२००८ रोजी महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी आचारसंहिता लागु झाल्याने याबाबत इकडील जा.नं. आस्था.२६०० दि.१७-१०-२००८ अन्वये मा.राज्य निवडणूक आयोग यांचे मार्गदर्शन मागविण्यांत आले असता मा.राज्य निवडणूक आयोग यांनी दि.१८-१०-२००८ च्या पत्रानुसार याबाबत महासभा घेण्यांस अनुमती दिली आहे. मात्र सानुग्रह अनुदानाचे वाटप करतांना त्यामध्ये कोणत्याही पदाधिका-याचा किंवा राजकीय पुढा-याचा समावेश असु नये असे सुचित केले आहे.

तरी मा.राज्य निवडणूक आयोग यांचे पत्रानुसार व त्यांनी दिलेल्या मार्गदर्शनानुसार कार्यवाही करण्यांस सदरचा विषय मा.महासभेपुढे घेणेबाबत आदेशार्थ सादर.

आस्थापना प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका.

**विषय क्रमांक : १**

प्रेषक : आस्थापना प्रमुख
प्रति : मा.नगरसचिव.

**प्रस्तावना :**

**विषय : अहमदनगर महानगरपालिकेतील कर्मचा-यांना सानुग्रह अनुदानाबाबत.**

**टिप्पणी :** विनंती रिपोर्ट सादर की, अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना दिवाळीसणासाठी सानुग्रह अनुदान बाबतचा विषय मा.सर्वसाधारण सभेपुढे निर्णयासाठी घेणेबाबत मा.नगरसेवक यांनी पत्र दिलेले आहे.

तसेच कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान प्रत्येकी रूपये ११,००० /- मिळणेंबाबत अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांनी पत्र दिलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेमध्ये सध्या आस्थापना सुचिवर २५५० कायम कर्मचारी कार्यरत आहेत.

माहे सप्टेंबर २००८ च्या वेतनातील वजाती, रक्कमांच्या जमाखर्ची , ऑक्टोंबर २००८ चे वेतन व पेन्शन, निवडणूक खर्च ठेकेदार व पुरवठादार यांची प्रलंबित देयके अदा करणे व वर नमुद केलेल्या बाबीवरील खर्च विचारात घेता रक्कम रू.११,००० /- सानुग्रह अनुदान देणे शक्य नाही. याबाबत मा.पदाधिकारी यांना माहिती देण्यांत आली.

सदरच्या विषयावर उभयपक्षांच्या वाटाघाटी होवुन सर्वमान्य तडजोड व्हावी व यातुन कर्मचा-यांना द्यावयाची रक्कम यावर चर्चा व्हावी यास्तव मा.पदाधिकारी महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी तसेच महानगरपालिका कामगार युनियनचे पदाधिकारी यांची संयुक्त बैठक दि.१५-१०-२००८ रोजी घेण्यांत आली. सदर बैठकीमध्ये सविस्तर चर्चा होवुन पात्र कर्मचारी निहाय रक्कम रू. ७००० /- देण्यांबाबत उभयपक्षात करारनामा करण्यांत आला. परंतु दि.१६-१०-२००८ पासुन निवडणूक आचारसंहिता लागु झाल्याने सदरच्या विषयाबाबत महासभेपुढे प्रस्ताव घेण्यांसाठी मा.राज्य निवडणूक आयोगाकडे पत्रव्यवहार करणेंत आला. त्यांनी दिलेल्या अनुमतीनुसार व मार्गदर्शनानुसार कार्यवाही करणेस्तव सदरचा करारनामा व त्यामधील अटी शर्ती व सानुग्रह अनुदान देण्याबाबतचा फेर प्रस्ताव मंजुरी मिळणेस्तव मा.खास सभेपुढे सादर.

आस्थापना प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**मा.महानगरपालिका ठराव क्रमांक :** **दिनांक : २२/१०/२००८.**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना सन २००७-२००८ करीतासानुग्रह अनुदान देणे बाबतचा विषय मा.सर्व साधारण सभेपुढे घेणे बाबत मा.श्री.कोतकर भानुदास एकनाथ, नगरसेवक व मा.श्री.कावरे आसाराम हरिभाऊ, नगरसेवक यांचे पत्र तसेच महानगरपालिका कामगार युनियन यांचे संपाबाबतचे पत्र.

---*---